# न्याय

देवस नावाचे एक छोटेसे गाव तीन डोंगराच्या कुशीत वसलेले होते. जवळचे शहर म्हणजे सांगली. ते चाळीस-एक मैलावर होते एसटीच्या गाड्या  दिवसातुन तीन चार फेऱ्या करायच्या. काय हवे ते शहरात जाऊन आणता येई. गावात प्राथमिक  शिक्षणाची सोय होती पण पुढच्या शिक्षणासाठी सांगलीलाच जावे लागे. गावात ब्राम्हणांची दहा बारा घरे होती. त्यांची मुले शिक्षणासाठी एकदा घराबाहेर पडली की परतून वळत नसत कारण पुढचे शिक्षण, नोकरी-धंदा यासाठी त्याना लांबची क्षितिजे खुणावीत. एकदा मुंबई, पुणे गाठले की त्यांची गावची भेट नगण्यच असे. त्यामुळे त्यांच्या घरात आता जुनी खोडेच आढळत. गावात बहुतेक घरे शेतकऱ्यांचीच होती. आपले शेत कसावे होईल त्या मिळकतीत जमेल तसे जगावे. पण कधी कधी आजारपण लग्नकार्य अशा अडचणी ऊभ्या रहात. अशावेळी सावकाराकडे हात पसरावा लागे. मग हे अडलेले अडाणीपणे गहाणखतावर अंगठा उठवत आणि कधी एकेकाळचा शेतमालक शेतमजूर होई ते त्यालाच कळत नसे. गावात एक लोटा घेऊन आलेला शंभु रांभिया आता अर्ध्या गावचा मालक शांभाशेटजी झाला होता. त्याच्या कुटील नीतीला जाणून काही शहाणे शेतकरी आपल्या गरजा मर्यादित ठेऊन आपले जीवन शांतपणे जगत होते. रामजी व सीता त्यापैकीच एक होते. सीताचा भाऊ सांगलीला रहायचा. त्याचा त्याना खूप आधार होता. तो चांगला शिकलेला होता व चांगला पगारदार होता. तो व त्याची पत्नी सीता-रामजी यांना फार मानत होते. सीता-रामजीला एक मुलगी होती. तिचे नाव शांती. ती नाजूक, सुंदर आणि नावाप्रमाणे शांत होती. तिला शिक्षणाची खूप आवड होती. ती सातवीत होती. मामामामी तिला सांगलीलाच ये म्हणत होते पण आईबाबांना सोडून जायला तिचे मन तयार नव्हते. पुढच्या वर्षी तर जावे लागणारच होते. शाळेतली ती पहिल्या नंबरची विद्यार्थिनी असल्याने शिक्षकही तिला सोडायला तयार नव्हते.   आपला अभ्यास व घर यापलीकडे तिचे जग नव्हते. गावात सावकाराचा दबदबा होता. त्यातुन त्याचा दुर्वर्तनी मुलगा परत आला होता, दररोज त्याचे कारनामे कानावर येत पण काही उपयोग नव्हता. कारण सावकाराने पोलिसाना मिंधे करुन ठेवले होते. त्यामुळेच तो मातला होता. त्याच्यापासुन लांब रहाणेच शहाणपणाचे होते. शाळेतल्या मुली तर त्याच्यापासून चार हात दूरच रहात. शांता तर त्याच्याकडे बघत पण नसे. ती व सुमती एकाच वर्गात सातवीत शिकत होत्या. त्या जोडीने शाळेत जात व जोडीने घरी परत येत. पुष्कळदा सातवीच्या वर्गाला उशीर पर्यंत शाळेत थांबावे लागे. पण त्या दोघी एकमेकीच्या सोबतीने घरी येत. त्यामुळे घरच्याना चिंता नसे. त्या दोघी

एकमेकींच्या घरी जाऊनही अभ्यास करीत. त्यांची शिक्षणाची आवड पाहून त्यांचे आईवडीलही खूष होते. त्यांच्या मनात त्या दोघीना खूप शिकू द्यायचे होते.

सावकाराचा मुलगा लहानपणापासूनच अतिशय मस्तीखोर होता. त्याची मस्ती दुसऱ्याला त्रास देणारी आणि दुष्टप्रवृत्तीची होती. सावकाराची बायको मनाने प्रेमळ व अतिशय सालस होती. तिला सर्वांना मदत करायला आवडे पण तिच्या नवऱ्याला ते आवडत नसे. तिला मुलाचा दुष्ट स्वभाव व आळशीपणा माहित होता. वडिलांच्या लाडाने तो वाढत होता म्हणून तिने त्याला शहरात शिकायला ठेवले होते.पण तिथेही आपले गुण उधळले व शाळेतून त्याला रस्टिकेट केले. आता त्याला गावात मोकळे रान मिळाले कारण त्याला अशा रितीने शाळेतून हाकलविल्यामुळे आईने अंथरुण धरले. तो आता शेतावर काम करणाऱ्या तरुण पोरीना त्रास देत असे. कोणी त्याला काहीच करु शकत नसे. कारण सावकाराला तो जे करेल ते शूरपणाचे वाटे व त्याच्या पाठिंब्यामुळे राकेश मातला होता.

त्यादिवशी सुमतीला बरे नव्हते. म्हणून ती शाळेत गेली नव्हती. जाताना शांताबरोबर शाळेतल्या इतर मुली होत्या. पण सातवीच्या वर्गाला जास्तीचे तास असल्याने येताना ती एकटीच होती. वाट नेहमीचीच, शांती खाली मान घालून पटपट चालत होती. नवीनच शिकवलेल्या बीजगणिताच्या वर्गपदावलीचा ती विचार करत होती. इतक्यात तिच्या समोर राकेश उभा राहिला. ती एकदम घाबरली तरीही धीर करुन बाजुने पुढे सरकली पण त्याने तिचा हात घट्ट धरला व म्हणाला, कुठे चाललीस? आपला हात सोडवून घ्यायचा प्रयत्न करीत ती म्हणाली हात सोड माझा मला घरी जाऊ दे. पण राकेश तिचे नाजूक कोवळे रूप पाहुन पागल झाला होता. म्हणाला, रोज बघतो मी तुला पण तुझी मैत्रिण असते ना तुझ्या बरोबर! आज बरी सापडलीस एकटी. आता तुला सोडेन बरा. त्याने तिला घट्ट धरले. तिने सुटायचा खूप प्रयत्न केला पण तो माजलेला बैल होता. तिने ओरडायचा प्रयत्न केला पण भितीने तिचा आवाजच फुटेना. शेवटी व्हायचे तेच झाले एक कोवळे पुष्प निष्ठूरपणे कुस्करले गेले. आपले काम आटपून तो नालायक पळून गेला. सरळ बस पकडून सांगलीला गेला. जाताना पोलिस चौकीवरील पोलिसाला मी सांगलीला जातो आहे असे बाबाना सांगा असा निरोप दिला.

इकडे काळोख झाला तरी शांती घरी आली नाही म्हणून तिची आई काळजीत पडली. तिला वाटले की सुमतीकडे अभ्यासाला गेली असेल म्हणून तिच्याकडे विचारायला गेली तेव्हा तिला कळले की आज बरे वाटत नाही म्हणुन सुमती घरीच होती. आता तिचा जीव घाबरला. नुकतेच घरात शिरणाऱ्या

रामजीला घेऊन ती शांताला शोधायला बाहेर पडली. शाळेच्या अर्ध्या वाटेत त्याना शांताचे दप्तर अस्ताव्यस्त पडलेले व पुस्तके आणि वहया विखुरलेली दिसली. त्याच्या पुढे झाडीत त्याना शांता सापडली. अंगावरचे कपडे फाडलेले, सर्वांगावर ओरखडे, रक्ताच्या थारोळ्यात त्यांचे लेकरु निपचित पडले होते. मन घट्ट करुन त्या दोघांनी तिला घरी आणले. बाळा कोणी हे केले? त्यावर तिने राकेश असे नाव घेतले व त्यानंतर तिने जे डोळे मिटले ते परत उघडलेच नाहीत. शेजारी गावात सगळीकडे बातमी पसरली. मरणाच्या दारात कोणी खोटे बोलत नाही. त्यात शांतीसारखी निष्पाप मुलगी तर शक्यच नाही. पण पोलिसानी तक्रार पण नोंदवून घेतली नाही. राकेश त्या दिवशी सांगलीला गेला असे पोलिसाने सांगितले. कदाचित बाहेरगावच्या वाटमाऱ्याचे हे काम असावे असे सांगून रामजी व त्याच्या मेहुण्याला वाटेला लावले. सावकाराने तर उगाच माझ्या लेकाचे नाव घेतात तेव्हा अब्रुनुकसानीचा खटला घालतो असा उलटाच दम दिला. राकेश तर आठ दिवस घरी फिरकलाच नाही. लेकीच्या मरणाचे दुःख रामजीला अतोनात झाले. तिच्यावर ज्याने बलात्कार करुन तिला मारले तो निर्दोष म्हणून फिरतो आहे. त्याच्यावर आरोपी म्हणून गुन्हा पण दाखल करता आला नाही याचे त्याला भयंकर दुःख झाले. त्याने शांतीच्या स्मृतीला स्मरुन मनोमन शपथ घेतली की पोरी तुला मी न्याय मिळवून देईन. आताशा त्याचे कशातच लक्ष नसे. चारचार दिवस तो घरीच येत नसे. आंघोळ नाही, जेवण नाही. कुठे जातो, काय करतो कोणास कळत नव्हते. सगळे म्हणत पोरीच्या मरणाने वेडा झाला. सीता बिचारी आपले दुःख पोटात दडवून नवऱ्याची होईल तशी काळजी घेई. नेहमीचा स्वच्छ तुकतुकीत चेहऱ्याचा रामजी हरवला होता. आता दाढी-केस वाढवलेला कधीतरी रात्रीचा घरी येई. सीता त्याला पोटभर जेऊ घाली. ती झोपल्यावर तो कधी ऊठून जाई ते तिला समजत पण नसे. असे जवळ जवळ चार महिने चालले होते. एक दिवस अचानक तो संध्याकाळी आला व सीतेला म्हणाला खूप भूक लागली आहे. पाणी पण गरम कर. आंघोळ करायची आहे. त्याने खूप दिवसांनी दाढी केली. सीताशी मोकळेपणी गप्पा मारल्या. त्याचे ते रूप बघून सीताला बरे वाटले. माझ्या शांताचा आत्मा शांत झाला असेल. असेही बोलता बोलता म्हणाला. तिला त्याच्या बोलण्याचा अर्थ कळला नाही. पण तो पूर्वीसारखा दिसतो आहे हे पाहून सीताला खरेच बरे वाटले. सकाळी ती उठली तर रामजी घरात नव्हता. माझा शोध घेऊ नकोस, भावाकडे सांगलीला जा. अशी चिठी गादीवर ठेवली होती. तिला काय करावे ते समजेना. तिने भावाला कळवायचे ठरवले. जरा वेळाने सुमतीची आई आली आणि तिच्या गळ्यात पडून रडू लागली. सीताला काही कळेना. तिने प्रथम तिला शांत केले व काय झाले? असे विचारले तेव्हा सुमतीची आई म्हणालीकी काल सुमतीवर शांतीसारखाच प्रसंग आला होता. पण तिचे नि आमचे नशिब बरे म्हणून तिकडे एक साधु आला. मला वाटते त्याच्या रुपाने देवच प्रगटला. त्याने

सुमतीला सुखरुप घरी पाठवले पण राकेशला जन्माची अद्दल घडवली. आताच कोणीतरी सांगितले की राकेश रात्री घरी आला नाही म्हणून त्याला शोधायला गेलेल्या माणसाना तो झाडीत अर्धमेल्या अवस्थेत सापडला. त्याला आता जन्मात स्वत:च्या पायावर उभे रहाता येणार नाही. त्याच्या मेंदूला पण जबरदस्त मार लागला आहे त्यामुळे तो कायमचा अपंग रहाणार. माझी सुमती वाचली तशीच तुझी शांता पण वाचायला हवी होती. सीताला आता रामजीच्या कालच्या वागण्या बोलण्याचा अर्थ ध्यानात आला. तिने भावाला बोलवून इथला पसारा आवरुन त्याच्याकडे जाण्याचा निर्णय घेतला. तिथे राहून ती रामजीचा शोध घेणार होती. तिला तिच्या नवऱ्याचा अभिमान वाटला. त्याच्या मायेने तिचे मन भरुन आले.

**लेखिका---नलिनी करंडे--माहीम**